पिंपरी चिंचवड महानगरपालिका
परिचर्या विज्ञान संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय,
संत तुकाराम नगर, पिंपरी पुणे - ४११०१८
जाहिरात क्रमांक – २०२६/२७-१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, परिचर्या विज्ञान संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये करार/एकत्रित ठोक मानधनावर खालील पदे हंगामी तात्पुरत्या स्वरूपात ३६४ दिवस कालावधीकरीता मुलाखतीद्वारे भरणेकामी अर्हताधारक उमेदवारांकडून online पध्दतीने अर्ज मागविण्यात येणार आहेत .सदर विषयाची सविस्तर जाहिरात पिंपरी चिंचवड महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

वरील सर्व संवर्गातील प्रवर्गनिहाय रिक्त पदे, प्रत्येक संवर्गाकरीता सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा तसेच अर्ज करण्याची अंतिम तारीख व नियुक्तीच्या अटी, शर्ती यांचे तपशील पिंपरी चिंचवड महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरील मुखपृष्ठावर आमच्या बद्दल, नोकरी विषयी या टॅब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे .

| अ.क्र. | पदनाम | रिक्त पद संख्या / आरक्षण | आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि अनुभव | वयोमर्यादा (कमाल) |
|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य<br>Principal | १<br>खुला प्रवर्ग<br>Open | शैक्षणिक अर्हता - एम.एस्सी (नर्सिंग) अनुभव- एम.एस्सी नर्सिंग सहित १५ वर्षे शिकवण्याचा अनुभव, पैकी १० वर्षे एम.एस्सी नर्सिंग पश्चात शिकवण्याचा अनुभव,<br>पी.एच डी. नर्सिंग इष्ट आहे. | खुल्या प्रवर्गासाठी ५०वर्षे<br>मागास प्रवर्गासाठी<br>५५ वर्षे |
| २ | उप प्राचार्य<br>Vice Principal | १<br>खुला प्रवर्ग<br>Open | शैक्षणिक अर्हता - एम.एस्सी (नर्सिंग)<br>अनुभव-एम.एस्सी नर्सिंग सहित १२ वर्षे शिकवण्याचा अनुभव, पैकी १० वर्षे एम.एस्सी नर्सिंग पश्चात शिकवण्याचा अनुभव<br>पी.एच डी. नर्सिंग इष्ट आहे. | खुल्या प्रवर्गासाठी<br>४५ वर्षे<br>मागास प्रवर्गासाठी<br>५० वर्षे |
| ३ | सहयोगी प्राध्यापक<br>Associate Professor | १<br>खुला प्रवर्ग<br>Open | शैक्षणिक अर्हता - एम.एस्सी (नर्सिंग)<br>अनुभव-एम.एस्सी नर्सिंग सहित ८ वर्षे शिकवण्याचा अनुभव, पैकी ५ वर्षे एम.एस्सी नर्सिंग पश्चात शिकविण्याचा अनुभव,<br>पी.एच डी. नर्सिंग इष्ट आहे. | खुल्या प्रवर्गासाठी<br>४० वर्षे<br>मागास प्रवर्गासाठी<br>४५ वर्षे |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक<br>Assistant Professor | १<br>खुला प्रवर्ग<br>Open | आवश्यक शैक्षणिक अर्हता - एम.एस्सी (नर्सिंग)<br>अनुभव-एम.एस्सी नर्सिंग सहित ३ वर्षे शिकवण्याचा अनुभव,<br>पी.एच.डी नर्सिंग इष्ट आहे. | खुल्या प्रवर्गासाठी<br>४० वर्षे<br>मागास प्रवर्गासाठी<br>४५ वर्षे |
| | | ४ | | |

उमेदवारांनी विहीत नमुन्यातील ऑनलाईन अर्ज भरण्यापुर्वी तसेच अधिक माहितीसाठी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर जाउन सविस्तर जाहिरात अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती आपलेकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरावा. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून ठेवणे आवश्यक आहे. विहीत नमुन्यातील ऑनलाईन अर्जाशिवाय अन्य कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाहित. तरी अधिक माहितीसाठी **www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावे**

जाहीरात क्र. २०२६५/२७-१४
वेबसाईट –www.pcmcindia.gov.in
क्र.वायसीएमएच/१३/कावि/२३४/२०२६
दिनांक- ०८/०४/२०२६

Digital Signature
Signature valid
Name : Vijay Namdeo Suryawanshi
Designation:Municipal Commissioner
Location:.
Date :07-04-2026 08:13

दिनांक : ०७/०४/२०२६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११०१८
परिचर्या विज्ञान संस्था,यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय,
संत तुकारामनगर, पिंपरी – ४११०१८.

दरमहा करार/एकत्रित ठोक मानधनावर हंगामी स्वरूपात ३६४ दिवस कालावधीकरिता मुलाखतीद्वारे तात्पुरत्या स्वरूपाची पदे भरणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, परिचर्या विज्ञान संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये करार/एकत्रित ठोक मानधनावर खालील पदे हंगामी तात्पुरत्या स्वरूपात ३६४ दिवस कालावधीकरीता मुलाखतीद्वारे भरावयाची आहेत. त्यांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, अटीशर्ती खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | पदनाम | रिक्त पद संख्या / आरक्षण | मानधन | आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि अनुभव | वयोमर्यादा (कमाल) |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य<br>Principal | १<br>खुला प्रवर्ग<br>Open | १,३०,००० | शैक्षणिक अर्हता - एम.एस्सी (नर्सिंग) अनुभव- एम.एस्सी नर्सिंग सहित १५ वर्षे शिकवण्याचा अनुभव, पैकी १० वर्षे एम.एस्सी नर्सिंग पश्चात शिकवण्याचा अनुभव,<br>पी.एच डी. नर्सिंग इष्ट आहे. | खुल्या प्रवर्गासाठी ५०वर्षे मागास प्रवर्गासाठी ५५ वर्षे |
| २ | उप प्राचार्य<br>Vice Principal | १<br>खुला प्रवर्ग<br>Open | १,०८,५०० | शैक्षणिक अर्हता - एम.एस्सी (नर्सिंग)<br>अनुभव-एम.एस्सी नर्सिंग सहित १२ वर्षे शिकवण्याचा अनुभव, पैकी १० वर्षे एम.एस्सी नर्सिंग पश्चात शिकवण्याचा अनुभव<br>पी.एच डी. नर्सिंग इष्ट आहे. | खुल्या प्रवर्गासाठी ४५ वर्षे मागास प्रवर्गासाठी ५० वर्षे |
| ३ | सहयोगी प्राध्यापक<br>Associate Professor | १<br>खुला प्रवर्ग<br>Open | ९३,००० | शैक्षणिक अर्हता - एम.एस्सी (नर्सिंग)<br>अनुभव-एम.एस्सी नर्सिंग सहित वर्षे शिकवण्याचा अनुभव, पैकी ५ वर्षे एम.एस्सी नर्सिंग पश्चात शिकविण्याचा अनुभव,<br>पी.एच डी. नर्सिंग इष्ट आहे. | खुल्या प्रवर्गासाठी ४० वर्षे मागास प्रवर्गासाठी ४५ वर्षे |
| ४ | सहाय्यक प्राध्यापक | | | आवश्यक शैक्षणिक अर्हता - एम.एस्सी (नर्सिंग) | खुल्या |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Assistant Professor | १<br>खुला प्रवर्ग<br>Open | ८१,५०० | अनुभव-एम.एस्सी नर्सिंग सहित ३ वर्षे शिकवण्याचा अनुभव,<br>पी.एच.डी नर्सिंग इष्ट आहे | प्रवर्गासाठी<br>४० वर्षे<br>मागास<br>प्रवर्गासाठी<br>४५ वर्षे |
| | | ४ | | | |

**टिप- १) अ. क्र.१,२,३ व ४ या पदास आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ३(१) (घ) तरतुदीनुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही.**

**<u>अटी व शर्ती -</u>**

१. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची मुदत दिनांक – १५/०४/२०२६ ते दिनांक – २०/०४/२०२६ पर्यंत http://103.224.247.133:8080/PCMCRecruitment/ या संकेतस्थळावर उपलब्ध राहिल.

२. वाय.सी.एम.एच वर क्लिक करुन ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याकरीता "Create New User" आपले खाते तयार करा यामध्ये आपले नांव, व तदअनुषंगिक माहिती, वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वणी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे. तसेच तदनंतर उमेदवाराने स्कॅन केलेले छायाचित्र व स्वत:ची स्वाक्षरी नमुना (५००KB पेक्षा मोठे नसलेले) अपलोड केलेनंतर नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर OTP प्राप्त होईल. OTP टाकुन Save केल्यानंतर आपले (New User ID) खाते तयार होईल. User ID- Password टाकुन ऑनलाईन अर्ज भरावा. यामध्ये पदनाम, जात-प्रवर्ग, पत्ता, शैक्षणिक अर्हता, अनुभव याची माहिती भरावी व जतन (Save) करावे. Print Preview वर क्लिक करुन भरलेली संपूर्ण माहिती बरोबर आहे का याची खात्री करावी. माहिती चुकीची वाटल्यास दुरुस्ती (Edit)करता येईल. खात्री झाल्यानंतर जतन ( Final Submit) करावे. तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक किमान भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत वैध असणे आवश्यक आहे.

३. ज्या उमेदवारांना एकापेक्षा जास्त पदांसाठी अर्ज करावयाचे असतील अशा उमेदवारांनी एका संवर्गात अर्ज पूर्णपणे भरुन पुन्हा नव्याने रजिस्ट्रेशन करावयाचे आहे. नव्याने रजिस्ट्रेशन करताना ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वापरावा. सदर User ID-Password जतन करणे आवश्यक आहे.

४. उमेदवाराने अलीकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो अपलोड करावा. फोटोमध्ये टोपी, गॉगल, मास्कने चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी. छायाचित्राची ईमेज ५००KB पेक्षा जास्त नसावी.

५. उमेदवारांनी विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज भरण्यापुर्वी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर जाऊन सविस्तर जाहिरात अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती आपलेकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरावा. विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्जाशिवाय अन्य कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

६. नियुक्ती करणेत येणा-या उमेदवारांनी रूजू होताना ते इतर कोणत्याही संस्थेत / शैक्षणिक संस्थेत नोंदणी / काम करत नसले बाबत हमीपत्र /कार्यमुक्त आदेश (रिलीव्हींग ऑर्डर ) करुन देणे बंधनकारक आहे.

७. भारतीय परिचर्या परिषदेने निर्धारीत केलेली वैद्यकिय संस्थातील अध्यापकांसाठीची किमान अर्हता Teachers Eligibility Qualification नुसार उमेदवाराची पात्रता असावी.

८. सर्व नेमणुका ह्या ३६४ दिवस कालावधीकरीता करार/एकत्रीत ठोक मानधनावर हंगामी स्वरूपाच्या आहेत, अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणूकीचा हक्क राहणार नाही. तसेच सदरच्या पदावर ज्या दिनांकास स्थायी आस्थापनेवर (सरळ सेवेने)

अध्यापक नियुक्त होईल त्या दिनांकास मानधनावरील अध्यापकांची सेवा संपुष्ठात येईल.तसेच उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता, गैरवर्तन या कारणासाठी त्यांची नियुक्ती कोणत्याही पुर्वसुचनेशिवाय संपुष्ठात येईल. आयुक्त पिं.चि.मनपा हे उपरोक्त पदांकरीता नियुक्ती प्राधिकारी असतील.

९. अधिष्ठाता यांचेकडून उमेदवारांच्या कामकाजाचे मुल्यांकन करण्यात येईल. तसेच अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्था हे महापालिकेच्या वतीने नियुक्तिच्या वेळी संबधितांबरोबर विहित प्रपत्रात करार करतील.

१०.आठवड्यातून फक्त एक दिवस साप्ताहिक सुट्टी राहिल. मानधन कालावधी दीड महिना काम केलेनंतर १ प्रमाणे एकुण ८ किरकोळ रजा एक वर्षासाठी देय राहतील. सार्वजनिक अथवा साप्ताहिक सुट्टीच्या ज्या दिवशी रुग्णालयाचे कामकाज बंद असते त्या दिवसाची सुट्टी उपभोगता येईल. तसेच सार्वजनिक सुट्टीचे दिवशी कामकाज करावे लागल्यास, केलेल्या कामकाजाबाबतचा कोणताही मोबदला / फायदे देय राहणार नाहीत.

११.उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केलेल्या दिनांकापुर्वी ज्या पदासाठी अर्ज केला आहे. त्या पदाची आवश्यक अर्हता धारण करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहताना शैक्षणीक अर्हता,जातीचे प्रमाणपत्र व जात वैद्यता प्रमाणपत्र, MNC रजिस्ट्रेशन, रजिस्ट्रेशन रिनीवल, अनुभव प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटो, तसेच कागदपत्रांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या प्रती उदा. प्रमाणपत्रे,फोटो इत्यादी सादर करणे बंधनकारक आहे. कागदपत्रांच्या तपासणीचे वेळी शैक्षणिक अर्हता धारण न करणे/अपुर्ण कागदपत्रे सादर करणारे उमेदवारास निवड प्रक्रीयेसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

१२.मुलाखतीस येण्याजाण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही.

१३.मानधनाचे पदावर कामकाज करताना आपणाकडुन सर्वांना नि:पक्षपातीने वागणूक मिळणे आवश्यक आहे.

१४. मानधनावरील नियुक्त केलेल्या उमेदवाराने सदर पदाचे काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पुर्वसूचना कार्लयास देणे आपणावर बंधनकारक राहिल. अन्यथा आपणास १ महिन्याचे मानधन महापालिका कोषागारात जमा करवे लागेल, त्याशिवाय अनुभव प्रमाणपत्र मिळणार नाही.

१५. सर्व पदांकरीता कामकाजाची वेळ ही सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत असेल. महाविद्यालयाच्या व रुग्णालयाच्या गरजे नुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. तसेच रुग्णालयीन सेवेच्या आवश्यकतेनुसार तातडीक सेवा करावी लागेल.

१६. नेमणुक केलेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेशात महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या अटी व शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. तसेच प्रस्तापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा व आयुक्त पिं.चि.मनपा यांनी नेमून दिलेली विविक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

१७. ज्या दिवशी मनपास नेमणूक केलेल्या उमेदवारांची आवश्यकता नसेल, त्यावेळी कोणतीही नोटीस न देता त्यांच्या सेवा संपुष्टात आणण्यात येतील.मानधनावरील नियुक्ती म्हणजे नोकरी नाही.

१८. नेमणुक झालेल्या उमेदवाराने महापालिका अस्थापनेवर वेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणुन निवेदन सादर करणार नाही किंवा तसा बाह्य दबाव आणणार नाही, व कोणत्याही न्यायालयामध्ये दावा दाखल करणार नाही, असे प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक राहिल.

१९. सदर जाहिराती समवेत असलेल्या विहित नमुन्यामध्ये आवेदन पत्र सादर करणे बंधनकारक आहे.

२०. उमेदवारांची नेमणुक झालेनंतर बायोमेट्रीक (थंम्ब इंप्रेशन) पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील व त्याबरोबरच हजेरी पुस्तकावर दैनंदिनी (दररोज) स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्या शिवाय मानधन अदा केले जाणार नाही.

२१.वयोमर्यादेतील अट पुर्ण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास वरील पदांबाबत वयाची अट शिथील करण्याचे अंतिम अधिकार मा. आयुक्त सो. यांना राहतील. शासकीय / निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत असणा-या अध्यापकांसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम असेल.

२२. निवड झालेल्या उमेदवाराने आदेशाच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये रुजू व्हावे. विहित मुदतीत रूजु न झालेस आपणांस महापालिका सेवेची आवश्यकता नाही असे समजण्यात येऊन तदनंतर सदर रिक्त पदावर अन्य उमेदवारांची / प्रतिक्षाधीन उमेदवारांची नेमणुक करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२३.सदर पदांची संख्या कमी जास्त अथवा रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना राहतील.

२४.उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी व मुलाखतीसाठीच्या सुचना ह्या वेळोवेळी मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेस्थळावर प्रसीध्द करण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरती प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत वेळोवेळी मनपा संकेतस्थळावरील सुचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सुचना पाहिल्यानाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

तरी इच्छुक उमेदवारांनी वरील पदांकरीता दिनांक – १५/०४/२०२६ ते दिनांक – २०/०४/२०२६ अखेर मनपाचे www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा. तदनंतर पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामधील दुसरा मजला चाणक्य प्रशासनकीय कार्यालयामध्ये दिनांक २१/०४/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते ०१.०० पर्यंत आपल्या ऑनलाईन केलेल्या अर्जाची छायांकित प्रत तथा आवश्यक त्या कागदपत्रांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या प्रतिंसह जमा करावेत. मुदतीनंतर व वेळेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

जाहीरात क्र. २०२६५/२७-१४
वेबसाईट –www.pcmcindia.gov.in
क्र/वायसीएमएच.१३/कावि/२३३/२०२६
दिनांक १०.०४.२०२६.

Signature valid
Digital Signature
Name : Vijay Namdeo Suryawanshi
Designation:Municipal Commissioner
Location:.
Date :07-04-2026 08:13